# रेट्याखेड्यात दहशत : गावातून पुरुषमंडळी बेपत्ता

## जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षकांनी दिली वृध्देच्या घरी भेट

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती/चुरणी, (दि.19)- रेट्याखेडा येथे जादूटोण्याच्या संशयावरून 77 वर्षीय वृध्देची धिंड काढून अघोरी छळ करण्याची धक्कादायक घटना बाहेर आल्यानंतर पोलीसांनी घटनेत समावेश असलेल्या आरोपींची धरपकड सुरु केली. ज्यामूळे गावात प्रचंड दहशतीचे वातावरण पहायला मिळत आहे. गावातील बहुतांश पुरुष मंडळी बेपत्ता झाली असून रविवारी(दि.19) जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांनी रेट्याखेडात भेट देवून गावकऱ्यांना काही आवाहन केले.*





धिंड काढल्याप्रकरणी याप्रकरणी आतापर्यंत पोलीस पाटील बाबू झापू जमुनकर (वय 45), सायबु भुऱ्या चतुर (वय 32),रामजी भूऱ्या चतुर (वय 42), साबुलाल तुंबा चतुर (वय 32), कविता सायबु चतुर (वय 35 रा.रेट्याखेडा) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना रविवारी अचलपूरच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर कोर्टाने आरोपींना 22 जानेवारी पर्यंतची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### ग्रामसभेतून होणार मार्गदर्शन

भविष्यात गावामध्ये अशाप्रकारचे प्रसंग घडू नये, यासाठी प्रशासनातर्फे मंगळवार, दि. 21 जानेवारी रोजी सभा आयोजित करण्यात आली आहे. यात नागरिकांना अशा प्रकारच्या घटना घडू नये, यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

### नागरिकांनी सजगता बाळगण्याचे आवाहन

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी रविवारी रेट्याखेड्यात भेट देवून ग्रामस्थांना गावांमध्ये सौदार्हपूर्ण वातावरण ठेवावे, असे आवाहन केले. जिल्हाधिकारी कटियार यांनी आज दुपारी रेयट्याखेडा येथे जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, प्रवीण झगडे, तहसीलदार जीवन मोरानकर, पोलिस उपअधिक्षक सिद्धेश्वर धुमाळ, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकडे यांच्यासह भेट दिली आणि घडलेल्या प्रकाराची संपूर्ण माहिती पिडीत महिलेकडून जाणून घेतली. रेयट्याखेडा येथील वृद्ध महिलेला 30 डिसेंबर रोजी गावातील पोलीस पाटील यांच्यासह काही नागरिकांनी जादूटोण्याच्या संशयातून अमानूष मारहाण केली होती. याप्रकरणी जिल्हाधिकारी कटियार यांनी गंभीर दखल घेत आज गावात जाऊन वृद्ध महिलेच्या घरी भेट दिली. सदर प्रकरणी महिलेकडून घटनेची संपूर्ण माहिती घेतली. यात पोलिस पाटलासह पाच जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. यात दोषी असलेल्या सर्वांवर कारवाई करण्यात येणार आहे.भेटी दरम्यान जिल्हाधिकारी कटियार यांनी गावातील नागरिकांशी संवाद साधला. गावात सौदार्हपूर्ण वातावरण ठेवावे, तसेच ज्येष्ठ नागरिकांसोबत मारहाणीसारखे अमानूष प्रकार होत असल्यास याचा विरोध करावा, असे आवाहन केले.

### ग्रापं सदस्यांकडून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न

अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे जिल्हाअध्यक्ष गणेश हलकारे यांच्या नेतृत्वात जिल्हा सचिव शेखर पाटील, जिल्हा संघटक हरिष केदार, शहर प्रमुख प्रकाश कळस्कर, संघटक गजानन चौखंडे यांनी रविवारी रेहट्याखेडात भेट दिली. यावेळी त्यांना अनेक गोष्टी आढळल्या ज्यामध्ये गावातील पुरुष मंडळी बेपत्ता असल्याचे दिसले, मुख्य आरोपी पोलीस पाटील बाबू झापू जामुनकर हा इथला बाहुबली असून तो माजी सरपंचा सह पोलीस पाटील, रोजगार सेवक आणि शासकीय धान्य वितरक असल्याचेही समोर आले. या प्रकार




दाबण्याचा प्रयत्न झाला असल्याचे समोर आले. इतकेच नाहीतर वृध्देवर अनन्वीत अत्याचार केल्यानंतर तिला 6 किलोमीटर जंगलात नेवून सोडले होते, येथील ग्रामपंचायत सचिव, आशा वर्कर व इतर शासकीय दूवे या प्रकाराला जबाबदार असल्याचे अंनिस च्या निरीक्षणात सांगण्यात आले. या वृध्देला शासनाने अर्थसहाय करुन तिचे पुनर्वसन करण्याची मागणीसुध्दा अंनिसकडून करण्यात आली आहे.



# भरधाव चारचाकी शिरली घरात

## नागरिकांचा रास्ता रोको

## बोरगाव धर्माळे येथील घटना

### एक गंभीर, अपघातानंतर वाहन पेटले





### सपोनि राऊत यांची गोरगरिबांवर दादागिरी

अपघाताच्या घटनेनंतर नागरिकांनी रास्ता रोको केला.मी त्यांना धीर देत होतो आणि समजावून सांगत होतो दरम्यान सपोनि रितेश राऊत यांनी गोरगरीब आंदोलकांवर दादागिरी सुरू केली.यामुळे राऊत आणि आंदोलक यांच्यातवाद निर्माण झाला होता.

**आशिष धर्माळे माजी सभापती**
**शिवसेना तालुका प्रमुख अमरावती.**

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ,(दि.19)-** अमरावती वरून नागपूर कडे जाणाऱ्या भरधाव चारचाकी वाहनाचे संतुलन बिघडल्याने ती कार थेट महामार्गारील एका घरात शिरली. घटनेत एक जण गंभीर असल्याची माहिती आहे. अपघातानंतर कारने पेट घेतल्याने कारची राखरांगोळी झाली, तर या घटनेने महामार्गालगत अतिक्रमण करून राहणाऱ्या रहिवास्यांनी आक्रोश करत महामार्गावर चक्काजाम केला. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमीला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, चारचाकी वाहन क्र.एम.एच.14/ सीएस 9161 सकाळी 6.30 वाजताच्या दरम्यान अमरावती वरून भरधाव वेगाने नागपूर कडे जात असतांना बोरगाव धर्माळे नजीक भारत पेट्रोलपंप जवळ अचानक कारचे संतुलन बिघडल्याने कार थेट महामार्गालगत असलेल्या झोपडीमध्ये शिरली. कारची धडक एवढी भीषण होती की, कडेला असलेले कडूनिंबाचे झाड देखील कोसळले. यानंतर कारने पेट घेतला व कारचा चालक फरार झाला. यामध्ये रस्त्यावर कुल्फी विकणाऱ्या राजू कुशवाह (वय 45, रा.बेलपुरा) नामक इसमाला वाहनाची धडक लागल्याने ते गंभीर जखमी झाले. डोक्याला इजा झाल्याने त्यांना तातडीने नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

घटनेनंतर महामार्गाच्या कडेला राहणाऱ्या सर्व अतिक्रमणधारक नागरिकांनी रस्ता रोको केला.महामार्गावर आम्हाला नाईलाजाने आणि जीव मुठीत घेऊन रहावे लागते. अश्या घटना वारंवार घडतात आणि आमची जीवितहानी होऊ शकते, त्यामुळे शासनाने आम्हाला जागा देऊन घरकुल मंजूर करावे अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. यावेळी नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार महेंद्र अंभोरे आपल्या पोलीस ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले होते. आंदोलनकर्त्यांची समजूत काढुन त्यांना घरी पाठविण्यात आले. जखमीला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डोक्याला गंभीर इजा असल्याने त्यांना तातडीने नागपूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान पंचायत समितीचे माजी सभापती आशिष धर्माळे यांच्या नेतृत्वात जोशीला रितेश राऊत, रितेश सहदेव राऊत, प्रविण नारायण श्रृंगारे, गजानन नारायण श्रृंगारे, महेश नागोराव राऊत, राजु विठ्ठल वानखडे, राजू मधुकर दुधमोचन, मंगेश तुळशीराम राऊत, सागर दिलीप वानखडे, समय गजानन वानखडे, मन्नू शंकरराव राऊत, बसंती रमेश राऊत, गीता मुन्नीलाल कठोते सर्व रा. संभाजी नगर बोरगाव धर्माळे व ईतर 50 ते 60 लोकांनी बेकायदेशीररित्या वाहतुकीस अडथळा निर्माण करून पोलिसांशी हुज्जतबाजी केल्यामुळे काही वेळ पोलीस व आंदोलक यांच्यादरम्यान वाद निर्माण झाला होता.

पालिसांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक नितेश राऊत यांच्या फिर्यादीवरून सर्व आंदोलकांवर बीएनएस कलम कलम 221, 126(2),189 (3),190 अन्वये गुन्हे दाखल केले आहे.

# मांडवा शिवारात आढळले जखमी बिबट्याचे पिल्लु

## चांदूर रेल्वे वनविभागाने केले रेस्क्यू



### 9 महिण्याचा बिबट नर जातीचा

सदर 9 महिण्याचा नर बिबट्याचे पिल्लू असुन खेळतांना वा झाडावरून पडल्यामुळे तो जखमी झाला असावा. त्याच्या मागच्या पायाला व कमरेला मार लागल्याने त्याला उठता येत नाही. त्याच्यावर प्रथमोपचार केल्यानंतर पुढील उपचाराकरीता परतवाडा येथील ट्राझिस्ट ट्रिटमेंट सेंटरला पाठविण्यात आले आहे. तेथे बिबट्याच्या जखमी भागाचा एक्स-रे काढून पूढे अद्यावत उपचार करून स्वस्थ झाल्यावर जंगलात सोडण्यात येईल असे चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार यांनी सांगीतले.

**महासागर प्रतिनिधी**


**चांदूर रेल्वे,(दि.19)-** तालुक्यातील मांडवा शेतशिवारातील एका शेतात जखमी बिबट्याचे पिल्लु शनिवारी (ता. 18) दूपारी 2 वाजताच्या दरम्यान आढळले. शेतमालकाने चांदूर रेल्वे वनविभागाला कळविल्यानंतर वनविभागाच्या चमूने त्याला रेस्क्यू करून प्रथमोपचारानंतर परतवाडा येथील टीटीसी सेंटरला पाठविले.

मांडवा येथील शेतकरी विजय दयाराम माहुलकर त्यांच्या मांडवा शिवारातील शेतात दूपारी 2 वाजता गेले असता पऱ्हाटीमध्ये एक बिबट्याचे पिल्लू आढळले. त्यांनी त्वरीत चांदूर रेल्वे वनविभागाला कळविले. चांदूर रेल्वेचे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार व अमरावती येथील वनविभागाची चमू त्वरीत घटनास्थळी पोहचले. त्यांनी जखमी बिबट्याला दोरीच्या साह्याने पकडून पिंजरात बंद करून चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात आणले. तेथे जखमी बिबट्यावर चांदूर रेल्वे येथील पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. मयुर स्थुल व भाष्कर गावंडे यांनी प्रथमोपचार केला.

बिबट्याच्या मागच्या पायाला व कमरेला गंभीर जखम झाल्याने त्याला पुढील उपचाराकरीता परतवाडा येथील ट्राझीस्ट ट्रिटमेंट सेंटर हलविण्यात आले. सदर कार्यवाहीत चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार, वनपाल अमोल गावनेर, वनरक्षक एस.एन. राठोड, अमरावती येथील वनविभागाची रेस्क्यु टिमचे वनरक्षक अतुल धस्कट, सुरज भांबुरकर, अक्षय चमणकर, आसिफ पठाण, सुशील तायडे, वनमजूर गणेश शनवारे यांनी मोलाची भूमिका बजावली.

# शहरात पुन्हा दुचाकी चोरीचे सत्र

## विविध ठाण्यात दोन गुन्हे दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - शहर पोलिसांनी काही दिवसांपूर्वीच दुचाकी चोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत. तरीसुध्दा शहरातील दुचाकी चोरीचे सत्र सुरुच आहे. 18 जानेवारी रोजी शहरातील विविध पोलिस ठाण्यात दुचाकी चोरीचे दोन गुन्हे नोंदविण्यात आले आहे. दुचाकी चोरीमुळे सर्व सामान्यांसह गोरगरिबांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

### मायानगरातून दुचाकी लंपास

राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मायानगर परिसरातून चोराने एमएच 37 एबी 2356 या क्रमांकाची दुचाकी लंपास केली. या घटनेची तक्रार उमेश सुरेश राठोड (30, रा. दापोरा, मानोरा, जि.वाशिम, ह.मु. शिवशक्तीनगर, अमरावती) यानी 18 जानेवारी रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

### एसटीच्या स्वच्छता कर्मचार्याचीच दुचाकी उडविली

राजापेठ बसस्थानक परिसरात उभी केलेली एसटी महामंडळाच्या स्वच्छता कर्मचार्याचीच एमएच 30 एवाय 1912 या क्रमांकाची दुचाकी चोराने लंपास केली. या घटनेची तक्रार राहुल दयालयसिंग रोहेल (34, रा. चपराशीपुरा) यांनी 18 जानेवारी रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा गुन्हा नोंदविला आहे.

## दोन दुचाकीमध्ये धडक, एक ठार

**अमरावती-** भरधाव दुचाकींमध्ये समोरासमोर झालेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाला. देवराव रामपत बचले (रा. पाबल, ता. पट्टुन, जि. बैतुल) असे मृताचे नाव आहे. या घटनेची माहिती मोहन किसनजी टाकरखेडे (58, रा. आझाद चौक, शेंदुरजना घाट) यांनी 18 जानेवारी रोजी शेंदुरजना घाट पोलिसांना दिली. मोहन टाकरखेडे हे एमएच 27 2067 ने शेतात जात होते. दरम्यान वळण रस्त्यावर ते असताना, त्यांच्या दुचाकीला एमपी 48 एमएस 7830 या क्रमांकाच्या दुचाकीने जोरदार धडक दिली. या अपघातात देवराव बचले हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता शेंदुरजना घाट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. परंतू त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

# आर्शिवाद बार मध्ये चोरी करणाऱ्याला अटक

## गाडगेनगर पोलिसांची कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.19)-** गाडगेनगर हद्दीतील सिंधी चौक स्थित आर्शिवाद हॉटेल, बिअर बार फोडून 67 हजार 800 रुपये किमंतीची विदेशी दारू चोरून नेणाऱ्या गजानन अरुण आत्राम ( ) याला अवघ्या 12 तासात गाडगेनगर पोलिसांनी अकोट येथून अटक केली. ताब्यातून एकुण 34 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रकाश हसमदास सोमनानी (45, रा. सहकारनगर, अमरावती) यांनी 17 जानेवारी रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली की, चोराने बारमधील गल्ल्यातील 7 हजार रुपयांची रोख, बिलिंग मशिन, संगणक, मॉनिटरर, विदेशी कंपनीच्या दारुच्या बॉटला असा एकुण 67 हजार 800 रुपयांचा माल चोरून नेला. या घटनेनंतर सोमनानी यांनी बारमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, गजानन आत्राम हा सीसीटीव्हीत दिसून आला. त्यामुळे सोमनानी यांनी गाडगेनगर पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसारपोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम 334 (1), 305 (ड्) अन्वये आरोपी गजानन आत्रामविरुध्द गुन्हा नोंदविला. सदर गुन्ह्याच्या तपासात गाडगेनगरच्या डि.बी. पथकाने गुप्त माहितीवरून आरोपीचा शोध घेतला आणि आरोपी गजानन अरुण आत्राम (वय 41 वर्ष, रा. अशोक नगर अमरावती) यास अवघ्या 12 तासात अकोटच्या हिवरखेड रोड येथुन ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने गाडगेनगर हद्दीतील गुन्हा केल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातून एलजी कंपनिचे काम्पुटर मॉनिटर, वायफाय राऊटर, बिलींग मशीन प्रिंटर व कम्पुटर असा एकुण 34 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन उल्लेखनिय कामगीरी केली आहे. सदर कार्यवाही पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त अरुण पाटील व पोलिस निरीक्षक ब्रम्हा गिरी यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गाडगेनगर डि.बी. प्रमुख एपीाय मनोजकुमार मानकर, पोलिस हवालदार भारत वानखडे, संजय इंगळे, जयसेन वानखडे, गुलरेज खान, महेश शर्मा, नितीन कामडी यांचे पथकाने केली.

# एस.टी.महामंडळाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांचे हाल

## नागपूर-इंदूर मार्गावर धावताहेत भंगार बसेस



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,(दि.19) -** नागपूर ते इंदूर दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) बेजबाबदारपणामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रवाशांचे म्हणणे आहे की, या लांबच्या प्रवासासाठी चांगल्या बसऐवजी भंगार बस चा वापर केला जात आहे. ज्यामुळे प्रवासात अडथळे निर्माण होत आहेत.

नागपूर-इंदूर मार्गावर एस.टी. महामंडळाकडे सहा बस उपलब्ध आहेत. परंतु, चांगल्या स्थितीतील बस न पाठविता खराब बसांना मार्गावर पाठविले जाते. याचा फटका अमरावती, परतवाडा, धारणी, आणि इंदूर येथे जाणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. खराब बसांमुळे वेळेवर प्रवास होत नाही आणि अनेकदा या बस रस्त्यातच बंद पडतात, ज्यामुळे प्रवाशांची गैरसोय होते.

### असंतोष आणि पर्यायांची निवड

एस.टी. महामंडळाने प्रवाशांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देत खराब बसांची जागा चांगल्या बसांनी घ्यावी. प्रवाशांची सुरक्षा आणि सुविधा याला प्राधान्य देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे आणि यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. एस.टी. महामंडळाच्या या दुर्लक्षामुळे प्रवाशांमध्ये मोठा असंतोष पसरला आहे. वेळेवर प्रवास पूर्ण करण्यासाठी अनेक प्रवासी खाजगी वाहनसेवा वापरण्याचा विचार करत आहेत. याचा मोठा आर्थिक तोटा एस.टी. ला सहन करावा लागू शकतो.

### रात्री 11 वाजेपर्यंत उशीर

एका प्रवाशाने सांगितले की, धारणीपर्यंत पोहोचण्यासाठी या बसांना रात्री 11 वाजेपर्यंत उशीर होतो. विशेषत: रुग्ण, महिलावर्ग, आणि आपत्कालीन प्रवाशांसाठी ही परिस्थिती खूपच त्रासदायक ठरत आहे. खराब बसांमुळे प्रवाशांना रस्त्यात अडकावे लागते, ज्यामुळे त्यांच्या प्रवासाचा वेळ आणखी वाढतो. नागपूर-इंदूर या लांब मार्गावर खराब बसांऐवजी चांगल्या स्थितीतील आणि वेळेवर चालणाऱ्या बसांचे नियोजन करावे. या मार्गाची लांबी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पिंगळा देवीचे दर्शन झाले जोखमीचे?

## गडावर जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा | जीव मूठीत घेऊन भक्तांना चालवावी लागतात वाहने



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.19 )–** विदर्भातील आराध्य दैवत आणि महाराष्ट्रातील पूर्ण शक्तिपीठांपैकी अर्ध शक्तीपीठ असलेल्या पिंगळा देवीच्या गडावर दर्शनासाठी जोखमीचे ठरत आहे. गडावर जाणाऱ्या मार्गाची अत्यंत दुर्दशा झाली असून भक्तांना जीव मूठीत घेऊन वाहने चालवावी लागतात.

पिंगळा देवीच्या दर्शनाला विदर्भातून नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून भक्तजन हजारोच्या संख्येने येतात. परंतु काही गेल्या दिवसापासून गोराळा पिंगळाई येथील पिंगळादेवी गडाच्या मार्गाचे बांधकाम अत्यंत कासव गतीने सुरु आहे.

रस्त्यावर माती आली असून बांधकामाच्य पाण्यामूळे हा मार्ग निसरडा झाला आहे. गडावर जाण्याकरिता घाट, वळणाप्रमाणे मार्ग लागत असल्याने वाहन चढण्यापुर्वी चाके जागीच फिरत आहे. भक्तांना , चार चाकी व मोटरसायकल वाहनांना गडावर नेणे शक्य होत नाहीत. नेल्यास अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यमान खासदार, आमदार आणि जिल्हा प्रशासनाने या गंभीर समस्येची अत्यंत निकडीने दखल घेणे गरजेचे झाले आहे.





### 10 कोटी रुपयांतून होत आहे काम

महाराष्ट्र सरकारने दखल घेऊन पिंगळा देवी गडावर भक्तांना सुरळीत जाता यावे या हेतूने पिंगळादेवी गड रस्त्यावर दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. नागपूर येथील कंत्राटदाराला काम दिले. सुरुवातीला जलद गतीने काम केले, परंतु आता कासव गतीने काम सुरु आहे. रस्त्यावर माती आणि मुरूम टाकल्यामुळे भक्तांना पायदळ चालणेही कठीण झाले आहे. वाहन घसरून दर दिवसाला अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. माणसे तर दुर जनावरांनाही चालणे कठीण झाले आहे.

### चैत्र मासापुर्वी काम पुर्ण करा!

ज्या कोणत्या कंत्राटदाराला हे काम देण्यात आले, त्या कंत्राटदाराची कानउघाडणी करुन थांबलेले काम चैत्र मासापुर्वी तातडीने मार्गी लावण्याची मागणी भक्तांकडून होत आहे. अन्यथा जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींना जनसामान्यांच्या मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असा इशारासुध्दा देण्यात आला आहे.

# स्वामित्व योजनेमुळे ग्रामीण जनतेत बळकटी येईल- जिल्हाधिकारी

## प्रधानमंत्र्यांचा लाभार्थ्यांशी संवाद | जमिनीच्या सनदीचे वितरण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.19 )–** स्वामित्व योजनेतून गावठानाच्या जमिनी मुळ मालकाच्या नावावर होणार आहे. यासाठी भूमी अभिलेख विभागाने मेहनत घेतली आहे. या योजनेतून ग्रामीण जनजीवनाला बळकटी मिळेल, असे मत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी व्यक्त केले.

जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हास्तरीय स्वामित्व योजनेतून सनद वितरणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार प्रताप अडसड, भूमी अभिलेखचे उपसंचालक डॉ.लालसिंग मिसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास, जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी महेश शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार म्हणाले, स्वामीत्व योजनेमुळे एक चांगले काम झाले आहे. इंग्रजकाळात जमीनचा सातबारा अस्तित्वात आला. त्यानंतर आता स्वामित्व योजनेमुळे गावठाणाची



जमीन मालकी हक्काने मिळणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील नागरिकांना याचा फायदा होणार आहे. यामुळे जमीनवर कुणालाही हक्क सांगता येणार नाही. त्यामुळे जमीन विषयक तंटे कमी होण्यास मदत मिळेल. नागरिकांच्या नावे जमीन असल्यामुळे त्यांना घर बांधणीसाठी बँकांचे कर्ज सहज उपलब्ध होतील. यापुढील टप्प्यात नागरी भागात ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात केलेल्या चांगल्या कामाप्रमाणे शहरी भागातही भूमी अभिलेखने कामे करावीत, असे आवाहन केले.

आमदार अडसड यांनी योजनेचा फायदा मोठ्या प्रमाणावरील जनतेला होणार आहे. जमीन नावावर होणे ही अतिशय चांगली बाब आहे. नागरिकांच्या दृष्टीकोनातून महत्वाचे काम होत आहे. त्यामुळे त्यांच्या कामाला प्राधान्य देण्यात यावे. या योजनेत ग्रामीण भागातील अर्थकारण बदलविण्याची क्षमता असल्याने योजना राबविताना आलेल्या अडचणी सोडविण्यात याव्यात. यात आलेल्या त्रृटी प्राधान्याने दुरूस्त कराव्यात, असे सांगितले. शिंदे यांनी प्रास्ताविकातून योजनेची माहिती तसेच होणाऱ्या लाभाबाबत माहिती दिली.

बयास यांनी मनोगत व्यक्त केले. सुरवातीला योजनेबाबत चित्रफित दाखविण्यात आली. यावेळी संजय धर्माळे, विद्या माहुरे, नंदू ठाकरे, प्रल्हाद चव्हाण, त्र्यंबक हांडे, गोविंद धवने, मनिष भटकर, लक्ष्मण शिरसाठ यांना प्रातिनिधीक स्वरूपात सनदीचे वितरण करण्यात आले.

# स्वामी विवेकानंद कॉलेज मध्ये रोजगार कक्ष समन्वयक कार्यशाळा




**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.19 )–** स्थानिक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्ट्स, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती जिल्ह्यातील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित महाविद्यालयातील रोजगार कक्ष समन्वयक जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती,विद्यार्थी विकास विभाग तर्फे विद्यार्थी कल्याणाच्या अनेक योजना राबविल्या जातात. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण व कौशल्ये आत्मसात करता यावी या उद्देशाने महाविद्यालयांमध्ये रोजगार कक्षांमधून वैशिष्ट्यपूर्ण कार्यकर्ता यावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या मार्गदर्शन कार्यशाळेस अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.प्राची वि.ठाकरे, संचालक ज्ञानसागर शिक्षण व बहुउद्देशीय संस्था वरूड, प्रमुख अतिथी म्हणून डॉ.राजीव बोरकर संचालक विद्यार्थी विकास विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ.सावन देशमुख सिनेट सदस्य, (सं.गा.बा.विद्यापीठ), मार्गदर्शक म्हणून प्रा आशिष देशमुख, (विभाग प्रमुख एम बी ए विभाग प्रो राम मेघे महाविद्यालय, बडनेरा) अमरावती, डॉ.एस.डी.पाचापांडे, (संगणक कक्ष विभाग,संगाबा विद्यापीठ) प्रमुख संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, डॉ.बी.एस.झरे (प्राचार्य स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्ट्स वरूड) यांची उपस्थिती होती.

व्यावसायिकिकरणाच्या अत्यंत वेगवान युगात रोजगार मिळवण्या करिता विद्यार्थी कोणती कौशल्ये आत्मसात करून तयार होईल याची पूर्व तयारी करून घेणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तांत्रिक उपाययोजना कशा आखाव्यात. विद्यापीठ स्तरावरून कोणते लाभ आणि ज्ञान विद्यार्थ्यांना करून देता येतील या सर्वच बाबींवर सखोल मार्गदर्शन या कार्यशाळेत करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी आपले विचार प्रगट केले.

# दिपक कुलट मुख्याध्यापक संघाच्या तालुका प्रतिनिधी पदी

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सूर्जी,( दि.19 )** – संत चंद्रभागाबाई शिक्षण संस्था कुंभारगाव द्वारा संचालित स्व. मोतीरामजी मालगे विद्यालयाचे प्राचार्य दीपकराव कुलट यांची अंजनगाव तालुका मुख्याध्यापक संघाच्या तालुका प्रतिनिधीपदी निवड करण्यात आली.

दि.7 जानेवारी 2025 रोजी पार पडलेल्या अंजनगाव तालुका मुख्याध्यापक संघाच्या सहविचार सभेत सर्वांच्या संमतीने मुख्याध्यापक संघामध्ये प्राचार्य दिपकराव कुलट यांची अंजनगाव तालुका मुख्याध्यापक संघाच्या तालुका प्रतिनिधी पदी निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल श्री



संत चंद्रभागाबाई शिक्षण संस्थेचे व स्व.मोतीरामजी मालगे संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# अखिल भारतीय युवा कला महोत्सवाची सांगता

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड( दि.19 )–** ढगा येथील कलाजीवन बहुउदेशीय संस्था, लिंगा येथील आदिवासी विकास शिक्षण संस्था, तसेच वरुड नगर परिषदेचे माझी वसुंधरा अभियान 5.0 यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय युवा कला महोत्सव 2025 चे तीन दिवसीय आयोजन नुकतेच यशोदाई मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते.

या महोत्सव मध्ये पुणे, मुंबई तसेच यवतमाळ, अकोला, वाशीम, नागपूर व यवतमाळ येथील आर्ट कॉलेज चे तब्बल संपूर्ण भारतातील 200 विद्यार्थी व तसेच सिनियर आर्टिस्ट व ड्रॉइंग टीचर सुद्धा सहभागी झाले होते. या महोत्सवाची सुरवात दि.10 जानेवारी 2025 ला झाली. या



कार्यक्रमाच्या उदघाटनाप्रसंगी माजी राज्यमंत्री बच्चू कडू तर माजी आमदार नरेश्चंद्र ठाकरे यांची उपस्थित लाभली होती. तसेच कलाजीवन बहुद्देशीय संस्थेचे मार्गदर्शक नितीन खेरडे, अध्यक्ष युवराज ठाकरे, उपाध्यक्ष डॉ.अरविंद बडघरे व सचिव पराग भोंडे, सह सचिव डॉ.झामाडे तसेच कायदे विषयक सल्लागार एड.आशिष काळे, संस्थेच्या संचालिका मोनिका इंगळे, भाग्यश्री वानखडे, आदिवासी विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र शेळके यांचीसुध्दा उपास्थिती लाभली होती. या तीन दिवसीय मोहत्सवामध्ये प्रथम दिनी विद्यार्थ्यांना कॅनवास व कलर चे वाटप करण्यात आले. दुसऱ्या दिवशी दि.1 जानेवारी 2025 ला सहभागी विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये परीक्षक म्हणून प्रसिद्ध नाट्य कलाकार जितेंद्र शेटीये व सिने कलाकार कांचन धोटे उपस्थित होत्या. या मोहत्सवाचा समारोपीय कार्यक्रम हा 12 जानेवारी 2025 ला पार पडला. ज्यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण झाले. या कार्यक्रमी नगर परिषद चे मुख्य कार्यकारी प्रवीण मानकर, प्रा.किशोर तडस, माजी नगर सेवक युवराज आंडे, माजी तहसीलदार कमलाकर देशमुख, डॉ.मनोहर आंडे, नितीन खेरडे प्रमूख पाहुणे म्हणून लाभले होते. या तीन दिवसीय कार्यक्रमात यशोदायी मंगलम चे सर्वोसर्वा सौरभ खेरडे यांची साथ मिळाली. संस्थेच्यावतीने नितीन ठाकरे प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या ज्यांनी मदत केली त्याचे आभार मानले.

# राहुल व्यायाम प्रसारक मंडळाचे शैक्षणिक कार्य प्रेरणादायी!

## प्राचार्य सुधीर महाजन यांचे प्रतिपादन | शाहू महाराज विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर,( दि.19 )** – शिक्षकांचे मार्गदर्शन, परिश्रम, पुस्तकांशी असलेला प्रामाणिकपणा महापुरुषांचा आशीर्वाद असेल तर निश्चितच विद्यार्थी भविष्यात उंचशिखर गाठू शकतो. शिक्षकांनी प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे काम केले चांगला विद्यार्थी घडून देशाचे प्रगती करू शकतो. संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर यांनी बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणुन ग्रामीण भागात बहुजनांना चलना देण्यासाठी शिक्षण संस्था स्थापन केल्या. विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देणारे मधुकरराव अभ्यंकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्व असल्याचे प्रतिपादन



पोद्दार इंटरनॅशनल स्कूल अमरावतीचे प्राचार्य सुधीर महाजन यांनी केले.

सालोड येथील छत्रपती शाहू महाराज विद्यालय व श्री वसंतदादा पाटील कनिष्ठ महाविद्यालय तसेच श्रीमती लक्ष्मीबाई अभ्यंकर प्री प्रायमरी स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले कार्यक्रमाच्या अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर प्रमुख पाहुणे संस्थेचे, सचिव प्राचार्य गजाननराव वानखडे, संचालिका प्रा. शुभांगी अभ्यंकर, कुडे हे होते.

### अडचणींवर मात करुन यश मिळवा!

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालिका प्रा. शुभांगी अभ्यंकर म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी नेहमी अडचणीवर मात करून यश संपादन करावे. या विद्यालयातून सहगुणसंपन्न विद्यार्थी घडला पाहिजे हेच स्वप्न संस्थापक अध्यक्ष, व संस्था अध्यक्षांची आहे. या विद्यार्थ्यातून शास्त्रज्ञ, अधिकारी, घडावी हीच माझी अपेक्षा आहे. यावेळी प्राचार्य सुधीर महाजन यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, संचालिका प्रा.शुभांगी अभ्यंकर, कुडे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रकाश पाटील इंझळकर, मंगलाताई वंजारी, रमेशराव ठाकरे, मनोहर बगळे, सुनिल पाटील इंझळकर, जगदीश भाऊ ढगे, प्रदीप राऊत, प्रमोद इंझळकर, मोबीन, हन्नन, अक्रम, अनिल राऊत शेखर साबळे, निलेश मुधोळकर, मनीष इंझळकर, मंगेश जोगे, प्रमोद मिसाळ, नितेश भोंगरे उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी नेहमी सतर्क असले पाहिजे-क्षितीज अभ्यंकर

अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर म्हणाले की, सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त असतो. विद्यार्थी सर्व गुण संपन्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी सतर्क असले पाहिजे. या विद्यालयात सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले आहे. या परिसरातील विद्यार्थ्यांना चांगले नागरिक घडवण्याचा प्रयत्न शिक्षक करीत आहे. मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' अंतर्गत ही शाळा तालुक्यातून प्रथम पटकाविला आहे. यामागे माझे वडील समाजभूषण मधुकर अभ्यंकर यांच्या अथक परिश्रमाने हे सर्व घडत आहे. नेहमी ते सामाजिक कार्य करत राहिले आहेत.

# आमदार सांस्कृतिक महोत्सव 24 पासून

**अमरावती,( दि.19 )–** प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट, अमरावती व शोध प्रतिष्ठान, अमरावती द्वारा आयोजित आमदार सांस्कृतिक महोत्सव 2025 ला 24 जानेवारीपासून सुरुवात होत आहे. या अंतर्गत स्वरशोध राज्यस्तरीय हिंदी/मराठी सिने गीत स्पर्धेच्या ऑडिशन ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्यामध्ये अगदी लहानग्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंतच्या स्पर्धकांनी आपलं सादरीकरण दिलं. विदर्भातील नवकलावंत येत्या 24, 25, 26 जानेवारी रोजी, सांस्कृतिक भवन, अमरावती येथे होणाऱ्या अमरावती आमदार सांस्कृतिक महोत्सवामध्ये आपली वेगळी अशी ओळख निर्माण करतील.

# अंजनगाव बारी येथे 'विजय ग्रंथा' चे पारायण

## जागतिक पारायण दिनानिमित्त आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.19 )–** संत गजानन महाराजांच्या भक्तांनी जागतिक पारायण दिनाचे औचित्य साधून सामुहिक पारायण पठणाने आयोजन करण्यात आले. अंजनगाव बारी येथील प्रतिष्ठित नागरिक लोकनेते वसंतराव सोनार यांच्या कुटूंबाने या कायर्यक्रमाचे माळीपुरा येथे विजय ग्रंथ सामूहिक पारायणाचे आयोजन (दि.12) केले होते. वाचक ह.भ.प.राजेंद्र श्रीखंडे उर्फ सुदामा आळंदीकर महाराज यांच्या सुमधुर वाणीतून हे आयोजन करण्यात होते. यावेळी 200 महिला व 25 पुरुष गजानन भक्तांनी विजयग्रंथाचे सामुहिक पारायणाचे वाचन केले.

विजय ग्रंथाचे पारायणाने वातावरण भक्तिमय झाले होते गजानन महाराज भक्तांसाठी ही एक पर्वणीच असल्याचे वाटत होते. श्रोते व विशेष करुन महिलावर्ग पारायण वाचणात देहभान विसरून तल्लीन झाले होते यावेळी भक्तांसाठी मध्यंतरी दोन वेळा अल्पोपहार महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी वसंत सोनार यांच्या पत्नी निलीमा, मुलगा मनोज व स्नुषा स्नेहा उपस्थित होत्या.

# शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनचा कारभार ढेपाळला?

## चहा पेक्षा किटली च 'चटके' दार




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.19 )–** तालुक्यातील शिरजगाव कसबा पोलीस स्टेशन नेहमी नेहमी विविध कारणांनी चर्चेत असते. याला कारण म्हणजे मध्यप्रदेश ची सिमा लागून असणे. अनेक ठाणेदारांना हवेहवेसे वाटणारे हे ठाणे आहे. नुसते ठाणे मिळाल्याने होत नाही, तर ठाण्याचा कारभार उत्तमरित्या चालणेही गरजेचे असते. गेल्या काही महिन्यांपासून शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनचा कारभार ढेपाळला असल्याचे पहायला मिळत आहे.

सध्या पोलीस स्टेशन हद्दीत दीर्घ काळ चालणारी बहिरम यात्रा सुरू आहे. परंतू काही पोलीस कर्मचाऱ्यांना ही यात्रा 'जॅकपॉट' भासत आहे. त्यामूळेच यात्रेमध्ये चहा पेक्षा किटली 'चटके' दार झाल्याचे दिसत आहे. काही दिवस आधी पोलीस कर्मचाऱ्यांला झालेल्या मारहाणीचे गुढ ही समोर येत आहे. त्यामूळे ठाण्याची परिस्थिती ठाणेदारांच्या नियंत्रणाबाहेर असल्याचे दिसत आहे.

### 'अमोल' अवैध व्यावसायिकांकरिता ठरतोय 'अनमोल'

परतवाडा मार्गावरील खरपी स्टॉपवर खाकीतला 'अमोल' अवैध व्यावसायिकांकरिता 'अनमोल' ठरत आहे. अमोल बहिरम यात्रेदरम्यान शनिवार, रविवार कोणत्याही गाडीची तपासणी न करता सरसकट वाहनांना पैसे घेवून 'आने दो' करत असल्याची माहिती आहे. या सर्व प्रकरणावर अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी लक्ष द्यावे अशी जनसामान्यांची मागणी आहे.

### अवैध वाळू वाहतूकीसाठी रेट कार्पेट ?

पोलीस स्टेशन हद्दीत शुभम च्या माध्यमातून अवैध वाळू वाहतुकदारांकरिता जणू रेट कार्पेटच अंधारल्या जात आहे. वाळू घेवून धावणाऱ्या प्रत्येक वाहनाचे लोकेशन शुभम कडून पोलीसांना प्राप्त होते, मात्र कारवाई होत नाही. शुभम हा कुठलाही कर्मचारी अधिकारी नसताना बहीरम यात्रेत मात्र आपला सूटबूट आणि जर्किंग मध्ये आपण पोलीस अधिकारी असल्याचे भासवते. या सर्व प्रकार वर ठाणेदार यांनी जातीने लक्ष देणे आवश्यक आहे. अन्यथा मोठी अनुचित घटना घडल्यास याला ठाणेदार जबाबदार ठरतील. यात्रेत मोठ्या प्रमाणावर गावठी दारू, विदेशी दारू, वरली, मटका सुरू आहे. याकडे पोलीसांचे दुर्लक्ष केले जात आहे. फक्त आर्थिक फायदा करण्याकडे जास्त भर काही खाकीतल्या लोकांचा दिसत आहे.

### खाकीतला सुनील, बाहेरचा शुभम घालताहेत धिंगाणा

पोलीस स्टेशन हद्दीत कत्तलीकरिता गोवंश वाहतूक, गुटखा तस्करी, वरली मटका, गावठी दारु निर्मीती तसेच देशी दारूची वाहतूक असे अवैध व्यवसाय मोठ्याप्रमाणात फोफावत आहेत. या व्यवसायाला फोफाविण्यामागे खाकीतला 'सुनील' व ठाण्याबाहेरचा 'शुभम' कारणीभूत ठरत आहे. या दोघांमुळे पोलीस स्टेशनचा कारभार ढेपाळत जात आहे. ठाणेदारांना या सर्व प्रकरणाची माहिती असताना देखील याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

# सार्वजनिक कामातून समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न-मंत्री संजय राठोड

## बोडना येथील समाज मंदिराचे लोकार्पण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.19 )–** गावापासून देशापर्यंतच्या विकासात समाज मोठे योगदान देते. त्यामुळे समाजाच्या विकासासाठी जेही शक्य आहे, त्या सर्व बाबी प्राधान्याने करण्यात येतील. यात सार्वजनिक कामातून समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले. बोडना येथील चापालाल महाराज पुण्यतिथी, समाज मंदिराचा लोकार्पण सोहळा व जाहिर सत्कार सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार बाबूसिंग महाराज, सुनिल राणा, आशिष धर्माळे, श्याम



देशमुख, दिलीपराव ठाकरे, देवानंद चव्हाण आदी उपस्थित होते. मंत्री राठोड यांनी, राज्य आणि देशभरात बंजारा समाज विविध क्षेत्रात अग्रेसर आहे. समाजाला योग्य दिशा मिळवून देण्यासाठी शासनाचा एक प्रतिनिधी म्हणून कार्य करीत आहे. समाजाच्या लहान घटकांपर्यंत पोहोचून त्यांचे प्रबोधन करण्यात येत आहे. आज चापालाल महाराज पुण्यतिथी अणि समाज मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने गावपातळीवरील कार्यक्रमात सहभागी होता आले. आजच्या कार्यक्रमात समाज मंदिराच्या निमित्ताने विकासकामाला गावात सुरवात झाली आहे. समाजासाठी जेही शक्य आहे, ती मदत करण्यात येईल. तसेच समाजाचे तांडे आणि गाव याठिकाणाहून निमंत्रण आल्यास त्याठिकाणी प्राधान्याने उपस्थित राहण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामाध्यमातून समाजाची सेवा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमापूर्वी मंत्री राठोड यांच्या हस्ते आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या समाज मंदिराचे फित कापून लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर मंत्री राठोड यांचा शाल व श्रीफळ देऊन जाहिर सत्कार करण्यात आला. त्यांना पारंपारिक बंजारा वेशभूषेत महिलांनी औक्षण केले.